जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुमार क्रांती
6 MAY 2019

# संत तुकडोजी महाराजांना विद्यापीठात अभिवादन



**कोल्हापूर (प्रतिनिधी)** : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्त कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या या कार्यक्रमात कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुमार क्रांती
6 MAY 2019

# शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात

कोल्हापूर: महाराष्ट्र राज्याचा ५९वा स्थापना दिन तसेच कामगार दिन शिवाजी विद्यापीठात आज उत्साहात साजरा करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सकाळी ठीक आठ वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, डॉ. पी.एस. पाटील, डॉ. ए.एम. गुरव, इनक्युबेशन व इनोव्हेशन सेंटरचे संचालक डॉ. आर.के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड यांच्यासह विविध अधिकार मंडळांचे सदस्य, अधिविभाग प्रमुख, शिक्षक प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी उपस्थितांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थितांसाठी आयोजित विशेष चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुमारक्रांती
6 MAY 2019

# डॉ. शालिनी लिहितकर यांचा आंतरराष्ट्रीय परिषदेत गौरव



कोल्हापूर (प्रतिनिधी): शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. शालिनी लिहितकर यांचा नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'इंडियन लायब्ररी लीडर्स अॅवॉर्ड फॉर प्रोफेशनल एक्सलन्स' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

नवी दिल्ली येथे १९-२० एप्रिल रोजी दिल्ली ग्रंथालय संघ आणि सतीजा रिसर्च फौंडेशन फॉर लायब्ररी अॅंड इन्फॉर्मेशन सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरी ग्रंथालय व माहितीशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेत देशभरातून ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाशी निगडित ५००हून अधिक व्यावसायिक, संशोधक, प्राध्यापक व शिक्षणतज्ज्ञ सहभागी झाले. या परिषदेत ग्रंथालय व ग्रंथपालन व्यवसायाच्या विकासासाठी आराखडा तयार करण्यात आला. परिषदेत ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल डॉ. शालिनी लिहितकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रसिद्ध विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ अशोक बेरी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान समारंभ झाला. यावेळी एन.आय.सी.चे माजी संचालक डॉ. एम. मणी, डॉ. पी.बी. मंगला, डॉ. एम.पी. सतीजा, डॉ. सी.पी. वसिष्ठ, दिल्ली ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. आर.के. शर्मा, सतीजा रिसर्च फौंडेशनचे अध्यक्ष डॉ. के.पी. सिंग आदी उपस्थित होते. डॉ. लिहितकर यांना या पूर्वीही विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये पुरस्कार प्राप्त झाले आहे. साधन व्यक्ती म्हणून त्यांनी देशभरात व्याख्याने दिली आहेत. त्यांचे अनेक शोधनिबंध प्रतिष्ठित जर्नल्समधून प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अकरा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# पुस्तक प्रकाशनांसह व्याख्यानाची पर्वणी

कोल्हापूर टाइम्स टीम

येत्या आठवड्यात कोल्हापूरकरांना पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने साहित्यातील नव्या प्रवाहांविषयी जाणून घेण्याची संधी मिळणार आहेत. तसेच काही वेगळ्या विषयांवरील व्याख्यानांमुळे वैचारिक शिदोरी मिळणार आहे.

## साहित्य संस्कृती

**रोजगार, व्यवसाय संधींविषयी**


राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरीक सेवा संघातर्फे ८ मे रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी व्यवसाय व रोजगार या विषयावर डॉ. एम. बी. शेख यांचे व्याख्यान होणार आहे. शाहूपुरीतील दुसऱ्या गल्लीतील राधा कृष्ण मंदिर येथे हे व्याख्यान होणार आहे.

**शाहू महाराज व बहुजन पत्रकारिता**

राजर्षी शाहू महाराजांच्या ९७ व्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांचे व्याख्यान होणार आहे. ६ मे रोजी सायंकाळी सहा वाजता शाहू स्मारक भवन येथे हे व्याख्यान होणार आहे. राजर्षी शाहू महाराज व बहुजन पत्रकारिता या विषयावर ते संवाद साधणार आहेत.

### अनुवादित 'फास' वाचकांच्या भेटीला

पत्रकार बाळासाहेब पाटील यांनी कादंबरीकार संजीव यांच्या 'फाँस' या हिंदी कादंबरीचा अनुवाद केला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर ही



कादंबरी बेतलेली आहे. या पुस्तकाचे प्रकाशन १२ मे रोजी खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते महावीर कॉलेजच्या ॲम्पी थिएटर येथे सायंकाळी पाच वाजता होणार आहे. यावेळी कृष्णात खोत, नामदेव माळी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचे अध्यक्ष विजय चोरमारे संवाद साधणार आहेत. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेतर्फे या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

# मोफत क्रिकेट प्रशिक्षण शिबिर सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे ७ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी मोफत क्रिकेट प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ झाला. २० मे अखेर हे शिबिर विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर संकुलाच्या मैदानावर सकाळी ७ ते ९ या वेळेत सुरू राहणार आहे. विद्यापीठाचे हंगामी प्रशिक्षक सुजय खोपडे आणि विद्यापीठाच्या माजी महिला क्रिकेटपटू चंदाराणी कांबळे हे मार्गदर्शन करणार आहेत.

# राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिदिनी व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** लोकराजा राजर्षी शाहू महाराजांच्या ९७ व्या स्मृतिदिनानिमित्त सोमवारी (दि. ६) दसरा चौकात अभिवादन करण्यात येणार आहे. सकाळी साडेआठ वाजता ट्रस्टच्या विश्वस्तांच्या हस्ते शाहू महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात येईल. सायंकाळी सहा वाजता डॉ. अलोक जत्राटकर यांचे 'राजर्षी शाहू महाराज आणि बहुजन पत्रकारिता' या विषयावर व्याख्यान होणार आहे. नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

# डॉ. आप्पासाहेब पवार यांच्याकडून वस्तुनिष्ठ इतिहास संशोधनाचा पाया

## डॉ. आनंद पाटील : डॉ. आप्पासाहेब पवार जयंतीनिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या कर्तृत्वाने इतिहासाच्या विवेचनाची नवीन दृष्टी नव्या विचारवंतांना मिळाली आहे. त्यांनी वस्तुनिष्ठ इतिहास संशोधनाचा पाया घातला, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद पाटील यांनी केले.

डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त विद्यापीठात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. पाटील यांचे 'इतिहासकार घडविणारे इतिहासकार डॉ.आप्पासाहेब पवार' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी टी शिर्के होते. ड

डॉ. पाटील म्हणाले, पुण्याला केंद्रित असणारे इतिहास संशोधनाचे केंद्र कोल्हापुरात आणण्याचे व शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून रुजवण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. पवार यांनी केले. बहुजनांच्या इतिहासाची खरी मांडणी करण्यासाठी लागणारे धैर्य, सयंम या गोष्टी त्यांच्याकडे होत्या. बहुजन समाजातील विद्यार्थी शिकून सक्षम व्हावा. बांधावरचा गरिबाचा मुलगा अधिकारी व्हावा, यासाठी कमवा आणि शिका सारखी योजना भारतात पदव्युत्तर शिक्षणासाठी सर्वप्रथम त्यांनी राबविली. या योजनेला आज ५० वर्षे पूर्ण होत आहेत.

डॉ. आप्पासाहेब पवार कमवा शिका प्रबोधनी यांच्यामार्फत विद्यार्थी भवनमध्ये राहून कमवा व शिका योजनेत शिक्षण घेणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. किसनरावकुराडे यांच्या 'गुरुकुलातील कुलगुरु डॉ.आप्पासाहेब पवार-काळ आणि कर्तृत्व' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. कुलसचिव डॉ. व्ही.डी. नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, प्राचार्य डॉ जी. पी. माळी, प्राचार्य मानसिंगराव जगताप, डॉ.एम.टी. हजारे, युवराज कदम उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. एस.जे. नाईक यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपाध्यक्ष डॉ. सी.टी .पवार यांनी करून दिला. सूत्रसंचलन बिरु वगरे, रेश्मा घोलप यांनी केले. सचिव प्रा.टी.के.सरगर यांनी आभार मानले.

# ‘शिव-शाहूं’चा लोककल्याणकारी वारसा

**कोल्हापूर : सागर यादव**

रयतेचे स्वतंत्र सार्वभौम स्वराज्य निर्माण करण्याचे कार्य शिवछत्रपतींनी केले. त्यांच्या कार्याचा वारसा जपत सामाजिक एकोप्याची व्यापक भावना विकसित करण्याचे कार्य शिवछत्रपतींचे वंशज राजर्षी शाहू महाराज यांनी केले. दोन्ही राजांनी रयतेला केंद्रस्थानी ठेवून आपली लोककल्याणकारी राजवट राबविली. आज (दि. ६) पारंपरिक तिथीप्रमाणे शिवछत्रपतींची जयंती आणि लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांची पुण्यतिथी, असा योग आला आहे. यानिमित्त ‘शिव-शाहू’ विचारांच्या वारशावर टाकलेला हा प्रकाशझोत...





## शिवछत्रपती जयंती- राजर्षी शाहू पुण्यतिथी विशेष

### कोल्हापूरकरांनी जपलाय ‘शिव-शाहू’ विचार

लोककल्याणकारी राजवटीचा ‘शिव-शाहू’ विचारांचा वारसा जपण्याचे कार्य कोल्हापूरकर कर्तव्य भावनेतून करीत आहेत. शिव छत्रपतींच्या स्फूर्तिदायी इतिहासाचे जतन व्हावे, या उद्देशाने शिवभक्त राजर्षी शाहूंनी आपल्या कारकिर्दीत शिवरायांविषयी विविध योजना राबविल्या. पुढे शाहूनगरीतील सूज्ञ जनतेने शिव छत्रपतींसोबतच लोकराजा राजर्षी शाहूंचा विचार जपला आहे. यामुळे कोल्हापुरात ‘शिव-शाहू’ नावाने अनेक संस्था-संघटना सक्रिय आहेत. अनेक पुरस्कारही या नावानेच दिले जातात.

**शिवछत्रपतींचा भक्कम पाया...**

देवगिरीच्या यादव राजांच्या पाडावानंतर महाराष्ट्रासह अवघा भारत मुघल सत्तेच्या गुलामगिरीखाली गेला. तब्बल ४०० वर्षे येथील जनता अन्याय-अत्याचारात भरडली. अंधारात चाचपडणाऱ्या येथील जनतेला स्वातंत्र्याचा सूर्य दाखविण्याचे आणि इतिहासाला कलाटणी देणारे अद्वितीय कार्य १७ व्या शतकात शिवछत्रपतींनी केले. केवळ स्वराज्य निर्माण करून ते थांबले नाहीत, तर त्याच्या सर्वांगीण विकासासाठीचे दूरदृष्टीचे कार्य केले. समाजातील पारंपरिक अनिष्ठ रूढी-प्रथांना बगल दिली. जाती-धर्मातील मक्तेदारी मोडून काढली. सती जाणे यासारख्या प्रथा बंद केल्या. जाती-धर्म भेदभावाच्या दुष्ट चक्रातून लोकांना मुक्त केले.

महाराष्ट्रातील लोकांचा मुख्य व्यवसाय असणाऱ्या शेतीच्या विकासासासाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या. शेतीसाठी आवश्यक पाणी साठ्यासाठी विशेष प्रयत्न केले. शेतकऱ्यांना शेतीसाठीच्या साधन-सामग्री उपलब्ध करून दिल्या. शेतसारा व तत्सम करात सूट दिली. जमीन मोजण्याच्या सोप्या पद्धती विकसित केल्या. सावकारी पाशातून लोकांची मुक्तता केली. शेती व पूरक व्यवसायांना बाजारपेठा उपलब्ध करून दिल्या. वस्तूंचे दर ठरविण्यात आले. चलन विकसित केले. व्यापाराकरिता डोंगर-दऱ्यात घाट रस्ता बांधणी, आरमार निर्मिती केली. यामुळे शिवछत्रपतींचा काळ म्हणजे केवळ लढाया आणि राजकारणापुरता मर्यादित नव्हता, तर या काळात रयतेच्या कल्याणासाठी आवश्यक विविध योजनांचा पाया घालण्यात आला.

**राजर्षी शाहूंकडून विकासाचा कळस...**

शिव छत्रपतींच्या रयतेच्या स्वराज्याचे रक्षण पुढे छत्रपती शंभूराजे, राजाराम महाराज, रणरागिणी ताराराणी यांनी केले. पुढे इंग्रजांच्या काळातही छत्रपतींच्या वंशजांनी पूर्वजांचा वारसा अखंड सुरू राखला. शिवभक्त असणाऱ्या लोकराजा राजर्षी शाहूंनी शिवकार्याचा विशेष वारसा जपला किंबहूना तो कित्येक पटीने विकसित केला. दूरदृष्टीने विचार करून काळाची गरज असणाऱ्या योजनांना प्राथमिकता दिली. दुष्काळावर मात करण्यासाठी धरणे, तलावांसह विविध पाणस्थळांची निर्मिती केली.

शेतीसह व्यापार उदीम वाढविण्यासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला. पारंपरिक शेतीला बगल देत आधुनिक साधनसामग्रींचा विकास केला. शेती उत्पादनांना योग्य दर देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीसारख्या योजना राबविल्या. याकरिता स्वतंत्र मार्केटयार्ड उभारले. व्यापाराचा विस्तार करण्यासाठी बाहेरील बाजारपेठांपर्यंत माल पोहोचविण्याची व्यवस्था म्हणून रेल्वे सुरू केली. वैशिष्ट्यपूर्ण गूळ निर्मितीला प्रोत्साहन दिले. उद्योग वाढीसाठी विशेष प्रयत्न केले.

शेती बरोबरच काळाची गरज असणाऱ्या शिक्षणाने जनतेला परिपूर्ण केले. यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद केली. विविध जाती-धर्मियांसाठी विद्यार्थी वसतिगृहे बांधली. भावी पिढी सदृढ-सक्षम आणि निर्व्यसनी राहावी यासाठी पेठापेठांत तालीम, संस्था उभ्या केल्या. यात शिवकालीन युद्धकला, मल्लखांब, कुस्ती यासारखे खेळ विकसित केले. राजर्षी शाहूंनी आपल्या सर्वांगीण कार्यातून शिव छत्रपतींनी निर्माण केलेल्या भक्कम पायावर विकासाचे कळस चढविले, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.